जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर
क्रमांक बी.१६(२)/४६/२०२१.
दिनांक : १५ एप्रील २०२१

# ''' परिपत्रक '''

संदर्भ :— १. जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर परिपत्रक क्र. बी—१६(२)/४५/२०२१ दि. १३.०४.२०२१.

उपरोक्त परिपत्रकाचे अनुषंगाने, मी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर खालील प्रमाणे परिपत्रक/निर्देश निर्गमीत करीत आहे.

१. असे निदर्शनास आले आहे की, दिनांक १० एप्रील ते दिनांक १८ एप्रील या संपुर्ण आठवडयातील जाहीर झालेल्या सार्वजनिक सुटींमुळे, सर्वसामान्य पक्षकारांना अटकपुर्ण जामीन अर्ज दाखल करणे शक्य झालेले नाही, त्यामुळे ते अटकेच्या भितीने मानसिक चिंतेत रहात असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. यामुळे सर्व सामान्याकडून अर्ज दाखल करून घेण्याची विनंती होत आहे.

२. करीता या परिपत्रकाद्वारे निर्देशीत करण्यात येते की, तांत्रीक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय येथील संबंधीत कर्मचाऱ्यांनी दिनांक १५ ते १७ एप्रील, २०२१ रोजी सकाळी ११.०० ते २.०० या कालावधीत असे अर्ज स्विकारून त्या दिवशी कार्यरत असलेल्या रिमांड अधिकाऱ्यांसमक्ष ठेवावेत.

सदर कार्यरत रिमांड अधिकाऱ्यांनी अर्ज तपासुन, संबंधीत प्रकरणात तातडीची गरज आहे असे त्यांना आढळल्यास योग्य ते आदेश पारीत करावे व नंतरच अर्जाची नोंदणी करून पुढील कार्यवाही करावी. अशा अर्जांवर अंतीम आदेश पारीत झाल्यास तो अर्ज तेच न्यायिक अधिकारी अंतीम निकाली काढतील.

३. ही व्यवस्था फक्त दिनांक १५, १६ व १७ एप्रील, २०२१ पुरती मर्यादीत राहील.

४. असेही निर्देशीत करण्यात येते की, याकामी नियुक्त असलेल्या सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित रहावे.

स्वाक्षरी/—

नागपूर
दिनांक १५/०४/२०२१

(एस. जी. मेहरे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
नागपूर.

**पृष्ठांकन क्र.बी—१६(२)/ /२०२१.** **दिनांक : १५ एप्रील २०२१.**
**प्रतिलिपी सस्नेह अग्रेषीत** :—

**प्रत माहितीस्तव अग्रेषीत**

१. जिल्हा व सत्र न्यायालय आस्थापनेतील सर्व न्यायालये, तालुका न्यायालये व विभाग, नागपूर

२. मा. जिल्हा सरकारी वकिल, नागपूर

३. मा. अध्यक्ष/सचिव, जिल्हा विधीज्ञ संघटना, नागपूर

४. सर्व मा. अध्यक्ष/सचिव तालुका विधीज्ञ संघटना, नागपूर

५. मा. सहायक संचालक व सरकारी अधियोक्ता, नागपूर

६. सर्व मा. अध्यक्ष/सचिव तालुका विधीज्ञ संघटना, नागपूर

७. मा. पोलीस आयुक्त, नागपूर

८. मा. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) नागपूर

९. मा. अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह, नागपूर

स्वाक्षरी/—
प्रबंधक
जिल्हा न्यायालय, नागपूर